तरुण भारत

# विद्यापीठ पदव्युत्तर प्रवेश परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विविध अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या पदव्युत्तर प्रवेश परीक्षेला शनिवारपासून प्रारंभ झाला आहे.

एमएस्सी. केमेस्ट्री, एमएस्सी मायक्रोबॉयोलॉजी, फार्मासिटीकल, इंडस्ट्रियल मायक्रोबॉयोलॉजी, अप्लाईड मायक्रोबॉयोलॉजी, एमएस्सी, झुलॉजी, एमएस्सी, फिजिक्स आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. ६८२५ पैकी ५८८० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षा १५ सप्टेंबरपर्यंत सुरू राहणार आहेत. तांत्रिक कारणाने परीक्षा न देऊ शकलेल्या विद्यार्थ्यांनी पुनर्परीक्षा घेण्याची विनंती केली होती. या परीक्षा १६ सप्टेंबरपासून घेण्याचे नियोजन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. तरी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ईमेल आयडी, मोबाईल नंबर अपडेट करावयाचा आहे. ज्यांनी मॉकटेस्ट दिलेली नाही त्यांनी मॉकटेस्ट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.